



Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे अंक : ७४०. वा मंगळवार दि. १६ एप्रिल २०२४ पृष्ठ ८ किंमत ३रुपये


# काँग्रेसने ओबीसीचा वापर वोट बँकसारखा केलाय, त्यांना ओबीसीवर बोलण्याचा अधिकार नाही- फडणवीसांचा हल्लाबोल

वृत्तसंस्था/नागपूर

काँग्रेसने ओबीसीचा वापर केवळ वोटबँक सारखा केला आहे. त्यामुळे काँग्रेसला ओबीसीवर बोलण्याचा अधिकार नाही, असा आरोप राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेसवर केला आहे. या देशात आणि राज्यात ओबीसीचे कल्याण केवळ भाजप आणि एनडीएच्या सरकारने केले आहे. काँग्रेसने सत्तर वर्ष ओबीसी आरक्षणाकरिता संविधानिक आयोग तयार केला नाही. तो आयोग नरेंद्र मोदी यांनी तयार केला. आज भारतात स्वतंत्रता नंतर जेवढी सरकार झाली त्या सरकारमध्ये सर्वात जास्त ओबीसी मंत्री नरेंद्र मोदी यांच्या सरकारमध्ये आहेत. ६० टक्के मंत्री हे ओबीसी, एससी आणि एसटी आहेत. जो आज पर्यंतचा रेकॉर्ड आहे. महाराष्ट्रात देखील स्वतंत्र ओबीसी मंत्रालय मी मुख्यमंत्री असताना झाले. त्यामुळे काँग्रेसला ओबीसीवर बोलण्याचा अधिकार नाही, असं बोलत देवेंद्र फडणविसांनी काँग्रेसला फटकारले आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान होते म्हणून एक चहा विकणारा मुलगा देशाचा पंतप्रधान होऊ शकला. असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अगदी स्पष्टपणे सांगितले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची एनडीए प्रमुख पदी निवड झाल्यानंतर त्या ठिकाणी पहिल्यांदा भारताच्या संविधानाची पूजा केली. नंतर त्यांनी आपले पद स्वीकारले. मोदीजी म्हणतात मला कोणत्याही ग्रंथापेक्षा संविधान जास्त महत्वाचे आहे. मागील दहा वर्ष पूर्ण बहुमत हे मोदीजींकडे आहे. आम्ही संविधानाचे रक्षण केले. संविधान बदलण्याचा विचार केला नाही, असेही फडणवीस म्हणाले.पुढे बोलताना फडणवीस म्हणाले की, सुप्रीम कोर्टाने स्पष्ट सांगितले आहे की संविधानाचे बेसिक स्ट्रक्चर बदलण्याचे अधिकार संसदेला नाही. हा काँग्रेसचा केवळ जुमला आहे. ज्यावेळी गणिताचे कार्य करता येत नाही ज्यावेळी कॅंडेबिलिटी संपलेली असते. अशावेळी लोकांच्या मनात संभ्रम निर्माण करायचा प्रयत्न काँग्रेस करत असते. हाच



प्रयत्न त्यांनी २०१४ ला केला होता. २०१९ ला ही केला होता आणि आता २०२४ ला ही करत आहे. मात्र लोकांचा विश्वास हा मोदीजींवर आहे. त्यामुळे देशातील जनता ही मोदीजींना मतदान करेल, असा विश्वास देवेंद्र फडणवीसांनी व्यक्त केला आहे.

# दुचाकी अपघातात १९ वर्षाची विद्यार्थिनी ठार : १ जखमी...

जनसंचलन/ शेगाव

अकोट रोडवरील उड्डाणपुलावर १५ एप्रिल रोजी दुचाकींची सामोरा - समोर टक्कर झाल्याने १९ वर्षीय विद्यार्थी युवती जागेवरच गतप्राण झाल्याची घटना रात्री ७ वाजता घडली. याबाबत सविस्तर असे की, कु. भारती सुनील दामोदर वय १९ वर्ष राहणार हायफाय कॉलनी शेगाववकु. साक्षी विलास माळीवय १९ राहणार सुरभी कॉलनी शेगाव ह्या दोघी मैत्रिणी आपल्या एम. एच ३० बी. एस. ४२६८ या क्रमांकाच्या स्कुटीने उड्डाणपूलावरून छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे येत असताना पुलावर समोरून येणाऱ्या एम. एच ३० बी. जे. ३४६८ या होंडा युणिकॉर्न दुचाकी धारकाने जोरदार धडक दिल्याने अपघात घडला. या अपघातात कु. भारती सुनील दामोदर ही १९ वर्षाची युवती ठार झाली आहे. तर तिच्यासोबत असलेली कु. साक्षी विलास माळी हि जखमी झाली असून तिच्यावर माऊली स्पेशालिस्ट हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहे. कु. भारती दामोदर ही माऊली कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला द्वितीय वर्षात आयटी शाखेला शिकत होती. तिच्या अपघाताने सर्वत्र शोककळा पसरली आहे. वृत्त लिहेपर्यंत रात्री ११ वाजता गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. घरची परिस्थिती मध्यम असतांना देखील मुलांना चांगले शिकवून त्यांच्या पायावर उभे करण्यासाठी रात्रंदिवस शेतात राबणाऱ्या शेतकरी सुनील दामोदर यांना एकूण तीन अपत्य होती. मोठी मुलगी कु. भारतीला इंजिनिअर करून उच्च पदावर पाठवायचे असा विश्वास त्यांनी मनाशी बाळगून भारतीला इंजिनिअरिंगला टाकले होते. भारतीने देखील जिद्द व चिकाटीने अभ्यास करून वडिलांची अपेक्षा




पूर्ण करण्याचा मानस ठेवत प्रथम वर्ष उत्तीर्ण करून द्वितीय वर्षाला होती. अशातच १५ एप्रिल रोजी रात्री ७ वाजेदरम्यान शिकवणी वर्गाला मैत्रिणीसोबत जातांना एका अज्ञात दुचाकीने भारतीच्या दुचाकीला समोरून धडक दिली व भारती जागेवरच ठार झाली. त्यामुळे तिचे इंजिनिअर होण्याचे स्वप्न अधुरे राहले. या प्रकरणी भादंवि कलम १७९, ३०४ अ, ३३७ नुसार अज्ञात विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## फास्ट फूड रेस्टॉरंटमध्ये चोरी १० हजाराचे साहित्य लंपास

जनसंचलन/ खामगांव

येथील शेगाव बोडवरील मायमेट फास्ट फूड रेस्टॉरंटमध्ये चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. अज्ञात चोरट्याने सदर रेस्टॉरंट मधून सीसीटिव्ही कॅमे-यासह साडेदहा हजाराचा ऐवज लंपास केला आहे. शेगाव रोडवर अमित गुंजकर यांचे मायमेट फास्ट फूड रेस्टॉरंट असून रविवारी रात्री दरम्यान अज्ञात चोरट्याने सदर रेस्टॉरंटच्या डायनिंग हॉलचे कुलूप तोडून आत प्रवेश केला व आत मधील एक सीसीटीव्ही कॅमेरा, एक स्पीकर, प्रिंटर, पेटीएम स्पीकर वाय-फाय राऊटर, लॅपटॉप चार्जर व गल्ल्यामधील ५०० रुपये असा एकूण १० हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना १५ एप्रिल रोजी सकाळी उघडकीस आली. याबाबत अमित गुंजकर यांनी शहर पोस्टेला तक्रार दिली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुध्द ४६१, ३८० भादंवीनुसार गुन्हा दाखल केला आहे.

## नको त्या अवस्थेत सापडल्याने एकाकडून मारहाण

जनसंचलन/ शेगाव

अचानक घरी आल्याने नको त्या अवस्थेत सापडलेल्या व्यक्तीने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना शहरातील एका परिसरात १४ एप्रिल रोजीच्या पहाटे २ वाजता घडली. याप्रकरणी तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी गजेंद्र मधुकर बाळापुरे याच्यावर विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. शहर पोलिसांत दाखल तक्रारीनुसार, फिर्यादी निवडणुकीच्या कामासाठी १३ एप्रिल रोजी रात्रीच्या कर्तव्यावर होते. तब्येत बिघडल्याने रात्री २ वाजता घरी परतले. त्यावेळी पत्नीला कॉल केला. तसेच दरवाजा उघडण्याचे सांगितले. घरात गेल्यानंतर पुरुषाची चप्पल आढळली. तसेच लगतच्या खोलीतील पंखा सुरू असल्याने त्यांनी विचारणा केली. पत्नीने उडवाउडवीची उत्तरे दिली. खोलीचा दरवाजा उघडला असता आरोपी गजेंद्र बाळापुरे नको त्या अवस्थेत दिसून आला. त्याला विचारणा केली असता बाळापुरे याने फिर्यादीस मारहाण केली. तसेच शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले. त्यावरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला.

# दिव्यांग मतदार जागृतीसाठी विशेष प्रयत्न

## दिव्यांग मतदारांच्या मतदानासाठी प्रशासन सज्ज...



**जनसंचलन/बुलढाणा**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग मतदार मतदानाच्या कर्तव्यापासून वंचित राहणार नाही, यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहे. त्यासाठी दिव्यांगासाठी काम करणाऱ्या सर्व स्वयंसेवी संस्था आणि कार्यकर्त्यांनी दिव्यांग जनजागृतीसाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी मनोज मेरत यांनी केले. स्थानिक अपंग कल्याण व पुनर्वसन संस्थेच्या वतीने आज दिव्यांग मतदार जाणीव जागृती करण्यात आली. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष अजय कारंजकर, सचिव जयसिंग जयवार, दिव्यांग कल्याण विभागाचे सहाय्यक सल्लागार शालिग्राम पुंड आदी उपस्थित होते. येत्या दि. २६ एप्रिल रोजी जिल्ह्यातील १ हजार ९६२ मतदान केंद्रावर बुलढाणा लोकसभा निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. दिव्यांग मतदारांसाठी सक्षम ॲप विकसित करण्यात आले आहे. यामध्ये नोंदणी करून दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रावर येण्याची सुविधा, व्हीलचेअर, तसेच आवश्यकता भासल्यास मागणीनुसार मदतनीस देण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने मतदारांनी विशेषतः नवमतदार, महिला, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांनी लोकशाहीच्या या उत्सवात उत्साहाने सहभागी होऊन मतदानाचे कर्तव्य पार पाडावे, यासाठी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक जाणीव जागृती करण्यात येत आहे. मतदान प्रक्रियेतील प्रत्येक घटकापर्यंत पोहचण्यासाठी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा स्वीप नोडल अधिकारी बी. एम. मोहन यांच्या पुढाकाराने विविध घटकांना केंद्रस्थानी ठेऊन सुनियोजित मतदार शिक्षण व निवडणूक सहभाग कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. यापार्श्वभूमीवर समाज कल्याण विभागाच्या वतीने दिव्यांग मतदारांसाठी स्वयंसेवी संस्था व कार्यकर्त्यांच्या माध्यमातून जाणीव जागृतीसाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने आज या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी जिल्ह्यातील सुमारे १८ हजार नवमतदार, सोळा हजार दिव्यांग मतदार, ३० हजार ज्येष्ठ मतदार यांच्यासह संपूर्ण मतदारांना लोकशाहीच्या उत्सवात उत्स्फूर्तपणे सहभागी करून घेण्यासाठी विविध उपक्रमांच्या माध्यमातून प्रशासनाने प्रयत्न सुरू केले आहे. दरम्यान जिल्ह्यातील सर्व दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना मतदान केंद्रावर आवश्यक असलेल्या मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची तयारी प्रशासनाने केली आहे. मतदानाच्या कर्तव्यापासून कुणीही वंचित राहणार नाही, यासाठी सर्वांनी संघटीत प्रयत्न करावेत, असे आवाहन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा स्वीप नोडल अधिकारी बी. एम. मोहन यांनी केले आहे.

# खामगांव मतदारसंघात व्होटर स्लिप चे वितरण

## मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी प्रयत्न



**जनसंचलन/ खामगांव**

जिल्ह्यात लोकशाहीचा उत्सव सुरु झाला असून लोकशाहीचा अविभाज्य घटक असलेल्या निवडणुकीमध्ये मतदार हा प्रमुख असतो.अश्यात बुलढाणा जिल्ह्यात लोकसभेसाठी दुसऱ्या टप्यात २६ एप्रिल रोजी मतदान होणार असल्याने प्रत्येक मतदाराला आपल्या मतदान केंद्रा सोबतच आपले नाव मतदार यादीत असल्याचे कळावे व जनजागृती व्हावी यासाठी २६ खामगांव मतदार संघात निवडणूक विभागाकडून घरोघरी मतदान चिठ्ठी (व्होटर स्लिप) व मतदान माहिती पत्रक चे २ लाख ८९ हजार ९९२ मतदार माहिती चिठ्ठीचे वाटप करण्यात येणार आहे. खामगांव मतदार संघात शेगाव व खामगांव हे दोन तालुके येतात, ज्यामध्ये येत्या लोकसभा निवडणुकीसाठी २ लाख ८९ हजार ९९२ मतदार असून ३१८ मतदान केंद्र स्तरीय अधिकारी मार्फत मतदार चिठ्ठी (व्होटर स्लिप) व मतदान माहिती पत्रक वाटप सुरु आहे. या मतदार स्लिप मतदारांना पोचत आहेत किंवा नाही हे तपासून बघण्यासाठी २१ सुपरवायजर नेमून दिलेले आहेत. तर मतदारांना व्होटर स्लिप दिल्यानंतर त्याची नोंद सुद्धा मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घेत आहेत.ज्याने मतदारांना वेळे पूर्वीच आपले नाव कोणत्या मतदार केंद्रात आहे, परिवारातील एखादा व्यक्ती बाहेर गावी गेलेला असेल तर त्याला सुद्धा मतदान तारीख, वेळ, मतदान केंद्राची माहिती व्होटर स्लिप मधून भेटेल तसेच मतदान करण्याप्रती त्याला जागरूकता निर्माण होण्यासाठी निवडणूक विभागाचा हा उपक्रम आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलितांचेच नव्हे तर भारताचे उद्धारक.-डॉ.गोपाल बशिरे



**जनसंचलन/ लोणार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळ दलीत उद्धारक नव्हे तर संपूर्ण भारताचे उद्धारक असे वक्तव्य भीम जयंतीच्या निमित्त कार्यक्रमात प्रा.डॉ. गोपाल बशीरे यांनी केले. चिखला येथे पार पडलेल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम घेण्यात आला आणि डॉ. गोपाल भोसले यांना प्रमुख मार्गदर्शक म्हणून पाचारण करण्यात आले होते आपल्या वक्तव्यातून डॉ. बशिरे पुढे म्हणाले संपूर्ण भारत देश हा अंधश्रद्धा, कर्मकांड आणि जातीयवादाने बरबटलेला होता या देशाला राज्यघटना देऊन भारताच्या प्रत्येक माणसास त्यास समानतेचा मूलभूत अधिकार दिला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून रजुभाऊ मापारि, गजानन जाधव, अमोल सुलताने, ॲड दीपक मापारि, परमेश्वर दहातोंडे, श्रीकांत नागरे, सतीश राठोड, विशाल चव्हाण, राजूभाऊ बुधवत, स्वप्नील हाडे, जीवन घायाळ, श्रीकांत मादनकर, लुकमान कुरेशी, इकबाल कुरेशी, उमर सैय्यद, छगन काळे, गणेश सोळंके, संजीवनीताई वाघ गणेश दहातोंडे दत्ताभाऊ डाखोरे इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती तर मोठ्या संख्येने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायी या कार्यक्रमास उपस्थित होते

# दुसरबिड येथील युवकांची लघुपट निर्मीती साठी धडपड...



**जनसंचलन/दुसरबिड**

विनोदी व थरारक लघुपटा ची निर्मिती सद्या दुसरबीड या ठिकाणी होत आहे , दुसरबीड व परिसरात मुंज्या या लघु चित्रपट ची शूटिंग सुरु असून या लघुपटाचे दिग्दर्शक व कथा लेखिका मोहिनी हिवाळे यांनी या लघुपटा विषयी सविस्तर माहिती दिली, मुंज्या हा शब्द महाराष्ट्रात विशेष करून ग्रामीण भागात जास्त प्रचलित आहे. ग्रामीण भागात अशी मान्यता आहे की जो मुलगा बिना लग्नाचा वारतो त्याचा मुंज्या होतो. त्याच संकल्पनेवर एक विनोदी भयकथा एम बी के फिल्मस् द्वारा पडद्यावर आणतायत. भूत लागणे भूत उतरवणे या गोष्टीतून जी विनोद निर्मिती होती त्याचे प्रस्तुतीकरण या चित्रपटात दाखवण्यात येणार आहे. सदर लघुपटाची निर्मिती दुसर बीड येथील मोबीन खान पठाण यांच्या एमबीके फिल्म प्रोडक्शन बॅनर अंतर्गत होत आहे. तर कथालेखक आणि दिग्दर्शक मोहिनी हिवाळे, छायाचित्रकार सोहम जायभाये, तसेच विशेष सहाय्यकार प्रवीण साबळे आहेत. या लघुपट ची शूटिंग ची सुरुवात गुढीपाडवा च्या मुहूर्त वर करण्यात आली आहे . येथील जी एस देशमुख सर यांनी शूटिंग चे उदघाटन केले असून , युवकांनी आपली कला जोपासावी ग्रामीण भागातुन युवक पुढे जावे विविध क्षेत्रात नाव अग्रेसर करावे ,असे आवाहन जी एस देशमुख यांनी केले. सदर लघुपटामध्ये प्रमुख भूमिकेमध्ये आहेत मोबीन खान, मोहिनी हिवाळे, विजय कांबळे, प्रज्ञा मोरे, नौशाद शेख, प्रवीण साबळे आदी आहेत याप्रसंगी गावातील श्री बाजीराव वाघ, श्री रमेश कोंढाणे, श्री समीर कुरेशी, श्री नासेर शेख बद्रि पालवे, इत्यादी उपस्थित होते.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# मतदानासाठी कामगारांना सुट्टी जाहीर...

जनसंचलन/बुलडाणा

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी बुलढाणा मतदार संघात दुसऱ्या टप्यात दि. २६ एप्रिल २०२४ रोजी मतदान होणार आहे. यात मतदारांना निवडणुकीच्या दिवशी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. निवडणूक होणाऱ्या मतदानक्षेत्रात सर्व मतदाराना त्यांचा मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी निवडणूक होणाऱ्या मतदानक्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात येणार आहे. सदर सुट्टी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने आदींना लागू राहिल, यात खासगी कंपन्यांमधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल्स, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना, तसेच माहिती तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स रिटेलर्स आदींचा समावेश आहे. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसल्यास मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टीऐवजी केवळ दोन ते तीन तासाची सवलत देता येईल. मात्र त्याबाबत जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी, बुलढाणा यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहिल. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन ते तीन तासांची सवलत मिळेल, याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील. त्यानुसार उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने आदींच्या मालक, व्यवस्थापनाने सूचनांचे योग्य पालन होईल, याची दक्षता घ्यावी. मतदारांकडून मतदानाकरीता योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त झाली नसल्याने मतदान करता येणे शक्य झाले नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित आस्थापनांविरुद्ध कारवाई करण्यात येणार आहे. मतदारसंघातील सर्व कामगारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी सर्व प्रकारच्या आस्थापनाधारकांनी भरपगारी सुट्टी द्यावी, असे आवाहन सरकारी कामगार अधिकारी यांनी केले आहे.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाने नोंदविले १६७ गुन्हे

जनसंचलन/बुलडाणा

राज्य उत्पादन शुल्क विभागाने लोकसभा निवडणूक २०२४च्या अनुषंगाने राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत १६७ गुन्हे नोंदविण्यात आले आहे. या १६४ वारस गुन्ह्यात १७० आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच ९ वाहनासह एकूण १८ लाख ५७ हजार ६२४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यांमध्ये देशी मद्य ६७२.६८ लिटर, विदेशी मद्य ८८.२ लिटर, ताडी १४८ लिटर, रसायन सडवा २ लाख ४८ हजार ५७० लिटर, हातभट्टी १ हजार ५९४ लिटर पकडण्यात आली आहे. जिल्ह्याला लागून असलेल्या मध्यप्रदेशच्या सीमेवर निमखेडी आणि हनवतखेड येथे सीमा तपासणी नाका उभारण्यात आला आहे. मध्यप्रदेशच्या सिमेपासून ४ किलोमीटर अंतरावर असलेल्या सुनगाव शिवार, ता. जळगाव जामोद येथे राज्य उत्पादन शुल्कच्या खामगाव पथकाने दि. २६ मार्च २०२४ रोजी दारुबंदी अधिनियमांतर्गत छापा टाकला. यात हातभट्टी निर्मितीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर छाप्यामध्ये १३० लिटर हातभट्टी, मोहासडवा १ हजार २०० लिटर, प्लॉस्टिक नळ्या ६ नग, पंधरा लिटरक्षमतेचे पतरी डबे ८६ नग, जर्मन घरव्या ६ नग, २० लिटर क्षमतेचे जार ५ नग. १० लिटर क्षमतेचे ३ कॅन असा ५९ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या गुन्ह्यामध्ये आरोपी राजू नथ्थू बोबडे, वय ५५ वर्षे आणि प्रशांत रत्नाकर राऊत, दोघे रा. सुनगाव ता. जळगाव जामोद यांना अटक करण्यात आली. तसेच राज्य उत्पादन शुल्कच्या बुलडाणा पथकाने दि. १० एप्रिल २०२४ रोजी गोतमारा शिवारातील कुऱ्हा फाटा, ता. मोताळा येथे हातभट्टी दारु ६० लिटर २ वा-



हनासह पकडण्यात आली. त्यात एकुण ८१ हजार ४०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यात आरोपी अनिल शिवाजी गवळी आणि सुनिल मोहनसिंग बिडवाल यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. परिसरात अशी अवैध मद्य विक्री अथवा बनावट मद्य निर्मिती आढळल्यास या विभागास टोल फ्री नंबर १८००२३३९९९९ वर किंवा व्हॉटअॅप नंबर ८४२२००११३३ वर किंवा ... या विभागाचे पोर्टलवर तात्काळ माहिती कळवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्हा रुग्णालयात रक्ताचा तुटवडा झाल्याने रक्तदान शिबिर घेण्याचे आवाहन...

जनसंचलन/बुलडाणा

जिल्हा रुग्णालयातील रक्त केंद्रात रक्ताचा साठा संपला आहे. काही दिवस पुरेल इतकाच रक्त साठा केंद्रात शिल्लक आहे. त्यामुळे स्वयंसेवी संस्थांनी रक्तदान शिबिर आयोजित करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. रक्त केंद्रातून प्रती महिना सरासरी ३०० रक्त पिशवी नि:शुल्क रक्त संक्रमणासाठी उपलब्ध होतात. उन्हाळा आणि इतर कारणामुळे रक्तदान शिबिराचे आयोजन होत नसल्यामुळे रक्त संकलन ठप्प झाले आहे. रक्त केंद्रात सध्या १५ रक्त पिशव्या शिल्लक आहेत. थॅलेसिमीया व सिकलसेल रुग्णांना कायमस्वरूपी आणि अपघात झालेल्या व्यक्ती आणि गर्भवती स्त्रियांना आपत्कालीन परिस्थितीत रक्ताची गरज असते. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि धार्मिक संघटनांनी रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यासाठी पुढाकार



घ्यावा, तातडीने रक्तदान शिबिरांचे आयोजन करावे, असे आवाहन रक्त केंद्र जिल्हा रुग्णालयाच्या जिल्हा रक्त संक्रमण अधिकारी डॉ. प्राची तायडे यांनी केले आहे.

# निवडणूक निरीक्षकांकडून मतमोजणी परिसराची पाहणी

जनसंचलन/बुलडाणा

लोकसभा निवडणुकीसाठी दि. २६ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. त्यानंतर दि. ४ जून रोजी मतमोजणी होणार आहे. बुलढाणा लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी बुलडाणा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत होणार आहे. या परिसराची पाहणी निवडणूक सामान्य निरीक्षक पी. जे. भागदेव यांनी केली. यावेळी त्यांच्यासमवेत जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुहासिनी गोनेवार, उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार आदी उपस्थित होते. निवडणूक निरीक्षक श्री. भागदेव यांनी मतदानानंतर मतदान यंत्रासह आदी साहित्य ठेवण्यात येणाऱ्या स्ट्राँग रूमची पाहणी केली. मतदानानंतर याठिकाणी रात्री उशिरा मतदान यंत्रासह इतर साहित्य येणार आहे. त्यामुळे पुरेशी प्रकाशाची सोय करण्यात यावी. तसेच संपूर्ण साहित्य ठेवण्यात आल्यानंतर प्रत्येक खोली सिल करण्यात यावी. सुरक्षेसाठी सर्व परिसरात सीसीटीव्ही कॅमेरा कार्यान्वित करण्यात आले आहे. याचे नियंत्रण योग्य पद्धतीने करण्यात यावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. प्रत्यक्ष मतमोजणीच्या ठिकाणी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या व्यतिरिक्त इतर कर्मचाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीमध्ये प्रवेश देण्यात येऊ नये. मतमोजणीवेळी व्हीव्हीपॅट मशिनवरील मतमोजणीसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात यावी. तसेच उमेदवारांच्या प्रतिनिधींना सुकर प्रवेश देण्यात यावा. मतमोजणीसाठी विधानसभा संघनिहाय व्यवस्था करण्यात आली आहे. याठिकाणी उमेदवार, तसेच निवडणुकीसाठी नियुक्त अधिकाऱ्यांसाठी बैठक व्यवस्था करण्यात यावी. मतदान यंत्र स्ट्राँग रूममधून आणणे आणि परत नेण्यासाठी वेगळी मार्गीका तयार करावी. तसेच मतपत्रिका, सर्व्हीस वोटरची मतमोजणीसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्याच्या सूचना श्री. भागदेव यांनी केल्या.

# पाणीटंचाई निवारण्यासाठी विंधन विहिरींना मंजुरी...



जनसंचलन/बुलढाणा

पाणीटंचाई निवारणासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहे. यात ४१ गावांसाठी ७ कुपनलिका आणि ६५ विंधन विहिरी मंजूर करण्यात आल्या आहेत. पाणी टंचाई निवारणार्थ शेगाव तालुक्यातील ४, सिंदखेडराजा २६, खामगाव १, नांदुरा मधील १०, बुलडाणा ४१ गावासाठी ७ कुपनलिका व ६५ विंधन विहिरी मंजूर करण्यात आल्या आहेत. य गावांमध्ये पाणी पुरवठ्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या आहेत. विंधनविहिरी घेण्यात आलेल्या गावांमध्ये ही कामे सुरू करण्यापूर्वी व काम पूर्ण झाल्यानंतर कामाचा पंचनामा कार्यकरी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, यांनी करावयाचा आहे. विंधन विहिरी शेगाव तालुक्यातील जानोरी, बेलुरा, कुरखेड, चिंचखेड. सिंदखेराजा तालुक्यातील दत्तपूर, डावरगाव, जऊळका, किनगाव राजा, पांगरी उगले, उगला, सावरगाव माळ, आडगाव राजा, शेलू, धांदरवाडी, जांभोरा, केशव शिवणी, वाघरुळ, वाकद जहागीर, मलकापूर पांग्रा, जळगाव, निमगाव वायाळ, पिंपळखुटा, निमखेड कसबा, सोनोशी, सोयदेव, तढेगाव, उमरद, वडाळी, वाघाळा, रुम्हणा, खामगाव तालुक्यातील खामगाव ग्रामीण, नांदुरा तालुक्यातील निमगाव, दादगाव, हिंगणा भोटा, हिंगणा दादगाव, बेलाड, खरकुंडी, पलसोडा, धाडी, हिंगणे गव्हाड, मोमिनाबाद या गावासाठी कूपनलिका व विंधन विहीर मंजूर करण्यात आली आहे. यामुळे या गावामधील पाणीटंचाई सुसह्य होण्यास निश्चित मदत मिळणार आहे, असे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

# वर्चस्वाच्या लढाईसाठी काका-पुतण्या विरोधकांच्या दारी

## पक्षफुटीमुळे जवळचे दूर, दूरचे आले जवळ...

वृत्तसंस्था/पुणे

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत पक्ष फुटीला सामोरे जात असताना अनेक राजकीय नेत्यांना कालपर्यंतच्या विरोधकांशी हातमिळवणी करावी लागत आहे. सहा दशकांच्या राजकारणात अनेक चढ-उतार पाहिलेल्या शरद पवार यांना आणि त्यांच्यात तालमीत तयार झालेल्या उपमुख्यमंत्री अजित पवार या काका-पुतण्यांना वर्चस्वाच्या लढाईसाठी एकेकाळच्या विरोधकांशी जुळवून घ्यावे लागते आहे. विरोधकांना कायम नामोहरम करत आलेल्या या दोन जुन्या-जाणत्या नेत्यांना आता याच विरोधकांची दारे ठोठावून पाठीमागे उभे राहण्यासाठी साद घालावी लागते आहे. बारामती लोकसभा मतदारसंघातून अजित पवार यांनी पत्नी सुनेत्रा पवार यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरविले आहे. वरकरणी भाजपवासीय कितीही नरेंद्र मोदी विरुद्ध राहुल गांधीची ही लढाई असल्याचे सांगत असले तरी ङ्गबारामतीफ्मध्ये काका विरुद्ध पुतण्या, पवार विरुद्ध पवार तसेच नणंद विरुद्ध भावजय अशीच लढत होत आहे. त्यामुळे थोरले पवार हे लेकीसाठी, तर धाकटे पवार हे पत्नीसाठी मैदानात उतरले आहेत.आतापर्यंत बारामती लोकसभेची संपूर्ण धुरा ही अजित पवार यांच्या खांद्यावर असायची. त्यामुळे नियोजनापासून ते त्याच्या अंमलबजावणीपर्यंत संपूर्ण प्रचाराची धुरा, प्रचार यंत्रणा अजितदादा एकहाती सांभाळत होते. आता वेगळे झाल्याने दोघा पवारांनी पत्नी आणि लेकीसाठी जवळच्यांसह विरोधकांना आपल्या गटात ओढण्यासाठी चढाओढ सुरू केली आहे. दुसरीकडे, अजित पवारही गप्प बसले नाहीत. त्यांनी महायुतीच्या बरोबरीने स्वतः बेरजेचे राजकारण सुरू केले आहे. विविध भागात मेळावे घेऊन त्या त्या घटकांना आपण केलेल्या मदतीची जाणीव करून देत तसेच पुढील काही वर्षे राजकारणात कोण राहणार याची जाणीव करून देताना त्या मतदारांसह नेत्यांना आपल्या गोटात ठेवण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे निवडणुकीच्या निमित्ताने अजित पवार आणि शरद पवार हे विरोधकांच्या दारात जाऊन त्यांच्याशी हातमिळविणी करीत असल्याने मतदारांना रोज नवे धक्के बसू लागले आहेत.पुरंदरमध्ये विजय शिवतारे, इंदापूरमध्ये हर्षवर्धन पाटील, दौंडमध्ये राहुल कुल यांच्याशी असलेला सुप्त संघर्ष शमविण्यात यशस्वी गेल्या ५५ वर्षापासून



संघर्ष असलेल्या बारामती तालुक्यातील माजी खासदार संभाजीराव काकडे, बाबालाल काकडे यांच्या कुटुंबीयांची नुकतीच निंबूत येथे भेट माळेगाव येथील माळेगाव कारखान्याचे माजी अध्यक्ष चंद्रराव तावरे यांच्या घरी जाऊन भेट इंदापूरमधील अप्पासाहेब जगदाळे यांच्यासह अन्य कार्यकर्त्यांना आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न सुरूबारामतीतील सुपे भागात पाण्यावरून कित्येक वर्ष संघर्ष सुरू असणाऱ्या १५ ते २० गावातील पुढारी कार्यकर्त्यांना जवळ करण्यात दोन पावले पुढे -- भोरमध्ये अनंतराव थोपटे यांच्याशी वैर सर्वश्रुत असतानाही सुनेत्रा पवार यांनी सर्वप्रथम त्यांच्या घरी जाऊन त्यांची विचारपूस केली.

## देऊळगावमही, देऊळगावराजात संदीप शेळकेंचा भव्य रोड शो शेतकऱ्यांच्या हिताच्या कल्याणकारी योजना राबवणार संदीप शेळकेंचे प्रतिपादन!

जनसंचलन/ देऊळगाव राजा

संपूर्ण जगाचे पोषण करणाऱ्या शेतकऱ्यांवरील संकटे अजूनही कमी झालेली नाहीत. मागील दोन दिवसांपूर्वीच बुलडाणा जिल्ह्यात झालेल्या वादळी वाऱ्यासह, गारपिटीमुळे जिल्हाभरातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या आधीही शेतकऱ्यांवर संकटे होतीच आणि आताही आहेत. शेतमालाला भाव मिळत नाही, पिक विम्याचे पैसे पूर्ण शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले नाहीत. त्यामुळे सद्यस्थितीत शेतकऱ्यांना आधार देणे अत्यंत गरजेचे झाले आहे. बुलडाणा जिल्ह्यात जवळपास पाच लाखांपेक्षा जास्त शेतकरी बांधव आहेत. त्यामुळे यंदाच्या लोकसभा निवडणुकीत जनतेने संधी दिली तर शेतकऱ्यांच्या हिताच्या कल्याणकारी योजना आपण राबवणार आहोत. शेतमालाला भाव मिळण्यासाठी विशेष प्रयत्न मी करणार आहे, जिल्ह्यात सिंचनाची टक्केवारी वाढली पाहिजे तसेच सिंदखेडराजा आणि देऊळगाव राजा तालुक्यात खाजगी कंपन्यांच्या सहयोगातून सीड हब आपण उभारणार आहोत. शेतकऱ्यांचे कल्याण होईल असे कार्य आपण करणार आहे, असे प्रतिपादन वन बुलढाणा मिशनचे संकल्पक तथा बुलडाणा लोकसभेचे अपक्ष उमेदवार संदीप शेळके यांनी केले. १५ एप्रिलला देऊळगाव मही, देऊळगाव राजा येथे त्यांच्या प्रचारार्थ भव्य रोडशो पार पडला. यादरम्यान जनतेशी संवाद साधताना ते बोलत होते. अपक्ष उमेदवार संदीप शेळके यांच्या प्रचारार्थ सकाळी देऊळगाव मही येथे उत्स्फूर्त प्रतिसादात रोडशो संपन्न झाला. त्यानंतर सायंकाळी देऊळगाव राजा शहरात छत्रपती शिवाजी महाराज व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला मानवंदना अर्पण करून प्रचार रॅली काढण्यात आली. बालाजी वेस, बालाजी मंदिर, माळीपुरा, धोंडीराम महाराज मंदिर, जालना रोड, अशा मार्गाने देऊळगाव राजा शहरात प्रचंड प्रतिसादात प्रचार रॅली संपन्न झाली. दरम्यान झालेल्या रोडशो मध्ये शहरवासीयांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.



पुढे बोलताना संदीप शेळके म्हणाले की, बुलडाणा जिल्ह्यातील शेतकरी कायम अडचणीत सापडतो. प्रस्थापितांच्या राजकारणामुळे शेतकऱ्यांवर दुर्लक्ष झाले आहे. आज शेतकऱ्याला कोरड्या सहानुभूतीची नाही तर प्रत्यक्ष मदतीची आवश्यकता आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी काम केले पाहिजे, शेतकऱ्यांच्या मालाला भाव, सिंचन सुविधा हे आपल्या विकास आराखड्यातील प्रमुख मुद्दे आहे. शेतपांदन रस्ते निर्मितीचा विचार आजवर कोणाच्याही लक्षात आला आहे. ती नाविन्यपूर्णता आपल्याकडे आहे, शेतकऱ्यांच कल्याण झाले पाहिजे हे आपले ध्येय आहे. आणि त्यासाठी आपण निवडणुकीच्या रिंगणात उतरल्याचे संदीप शेळके म्हणाले.

## शेगावमध्ये दोन कुटुंबात तुंबळ हाणामारी परस्परविरोधी तक्रारीवरून पोलिसात सात जणांवर गुन्हे दाखल

जनसंचलन/शेगाव



शेजारी राहणा-या दोन कुटुंबांमध्ये क्षुल्लक कारणावरून हाणामारीची घटना रविवारी रात्री ९ वाजताच्या दरम्यान शहरातील संगमनगरात घडली. त्यामध्ये दोघे जखमी झाले. परस्परविरोधी तक्रारीवरून दोन्ही कुटुंबातील सात आरोपींवर शेगाव शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. संगमनगर येथील रहिवासी आशा बबलू यादव यांनी पोलिसात तक्रार दिली. त्यामध्ये तीन आरोपींनी त्यांच्या घराच्या गेटला लाथा मारून शिवीगाळ केली. त्यांचा लहान मुलगा अजय बाहेरून आला असता आरोपींनी चापटबुक्क्यांनी मारहाण केली. आवरण्यास गेल्या असता त्यांनाही शिवीगाळ करून मारहाण केल्याचे म्हटले. तसेच मोठा मुलगा आकाश यादव यास आरोपी श्याम विठ्ठल डोंगे याने खांद्यावर पाठीवर मारून जखमी केले. जिवाने मारण्याच्या धमक्या दिल्या. याप्रकरणी तक्रार तसेच वैद्यकीय अहवालानुसार शहर पोलिसांनी आरोपी विठ्ठल डोंगे, राम विठ्ठल डोंगे, शाम विठ्ठल डोंगे सर्व रा. संगमनगर शेगाव यांच्याविरुद्ध भादंविच्या कलम ४५२, ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ नुसार गुन्हे दाखल केले. तर दुस-या कुटुंबातील कल्पना विठ्ठल डोंगे यांनीही तक्रार दिली. त्यामध्ये आकाश बबलू यादव याने त्यांच्या मुलासोबत वाद केल्याने समजावण्यासाठी त्यांच्या घरी गेली असता चार आरोपींनी शिवीगाळ केली. मुलांना चापटबुक्क्यांनी मारहाण केली त्यापैकी दोन आरोपींनी लोखंडी पाइपने त्यांचा मुलगा श्याम व रामा यांच्या डोक्यात मारून जखमी केले. जिवाने मारण्याच्या धमक्या दिल्या त्यावरून पोलिसांनी आरोपी आशा बबलू यादव, बबलू यादव, आकाश बबलू यादव, अजय बबलू यादव यांच्याविरुद्ध भादंवि कलम ३२४, ३२३- ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्हे दाखल केले. दोन्ही घटनेचा तपास शेगाव शहर पोलीस स्टेशनचे पोना नीलेश गाडगे करीत आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958